# गृह बाल विकास केंद्र

कुपोषण निर्मुलनासाठी ग्राम बाल विकास केंद्र हा उत्तम पर्याय होऊ शकतो परंतु हा पर्याय मॅम व सॅम बालकांकरिता आहे, जी मुले MUW व SUW मध्ये आहेत त्यांच्यासाठी वेगळा पर्याय शोधणे आवश्यक होते आणि त्यातूनच गृह बाल विकास केंद्राची संकल्पना तयार झाली.

**कुपुत्र जायेत क्वचीदपी कुमाता न भवती** या उक्तीचा आधार घेऊन गृह बाल विकास केंद्र सुरु करण्यात आली आहेत. ग्राम बाल विकास केंद्राचे यश तात्पुरते होते, बाळांच्या वजनांची घसरण केंद्र कालावधी नंतर दिसून येत होती म्हणून घरातच बाल विकास केंद्र सुरु करण्याची संकल्पना तयार झाली. या अंतर्गत बाळाच्या घरीच आहाराचे वेळापत्रक लावण्यात आले. या वेळापत्रकात कोणत्या वेळी बाळाला कोणता आहार द्यावयाचा याचे नियोजन करून देण्यात आले. दर २ तासांनी बाळाला आहार देण्यासाठी अंगणवाडी केंद्रात थांबण्याऐवजी आपले काम सांभाळून घरीच निर्धारीत वेळी बाळाला निर्धारीत आहार देणे मातेला सोयीचे होऊ लागले, वजन वाढीचा तक्ता व वृद्धी पत्रक घरातच लावल्यामुळे एका महिन्यात बाळाचे वजन किती वाढले व वरच्या श्रेणीत जाण्याकरिता बाळाचे किती वजनं वाढणे आवश्यक आहे हे सतत मातेच्या नजरेसमोर असल्याने वेळापत्रकाप्रमाणे आहार देण्याची मातेची मानसिकता तयार झाली, बाळाच्या आहाराची काळजी घेताना ब्रेड, बिस्कीट, खारी, टोस्ट, वेफर्स, कुरकुरे, फरसाण, चॉकलेट या सारखे पदार्थ बाळाला खावयास देऊ नये व चहा पाजू नये यासाठी मातांचे प्रबोधन करण्यात आले.



प्रत्येक अंगणवाडीताईकडे २ किंवा ३ च मुले असल्याने दिलेल्या आहाराचे मुल्यमापन करणे व द्यावयाच्या आहाराचे नियोजन व नियंत्रण करणे अंगणवाडीताईला सोपे झाले, त्यामुळे किमान ३ वेळा बाळांच्या घरी भेट देऊन अंगणवाडीताई आहाराचे सनियंत्रण करू लागली. अंगणवाडी ताई समवेत ए.एन.एम ताईही बाळाच्या घरी जाऊन त्याच्या आरोग्याचे मुल्यमापन सातत्याने करू लागले, परिणामी बाळाच्या वजनात वाढ झाली. सर्वात महत्वाचे म्हणजे बाळाची आईच नव्हे तर सर्व कुटुंब बाळाच्या वजनं वाढीबाबत जागृत झाले, त्याचा परिपाक म्हणून जिल्ह्याचे कुपोषित बालकाचे प्रमाण २४ टक्क्यावरून ६ टक्क्यावर आले आणि सातत्याने कमी होऊ लागले. ग्राम बाल विकास केंद्रापेक्षा हा अनुभव पूर्णपणे वेगळा होतो. बाळाचे वजन कमी न होता धीम्या गतीने का होईना पण वाढतं होते व सातत्याने वाढतच होते. चार महिन्यात दिसून आलेली वाढही बालके परतवे ४०० ग्रॅम पासून ते १७०० ग्रॅम पर्यंत दिसून आली.